RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




सोमवार, १७ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ८१ | दैनिक | किंमत : ₹५/-

Monday, 17 March 2025 | Year : 5 | Issue : 81 | Daily | Rate: Rs. 5/-

# मतदान ओळखपत्र-आधार जोडणीच्या मुद्यासंदर्भात महत्त्वाची बैठक



**नवी दिल्ली :** पॅनकार्डप्रमाणेच आता मतदान ओळखपत्रही आधार कार्डाशी जोडण्याची प्रक्रिया वेग धरू लागली आहे. याच मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी निवडणूक आयोगाने केंद्रीय गृह मंत्रालय, कायदे मंत्रालय आणि भारतीय विशिष्ट आधार प्राधिकरण (IDAI) च्या उच्च अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक येत्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. 2021मध्ये 1951च्या लोकप्रतिनिधित्व कायद्यात सुधारणा करून मतदारांच्या ओळखपत्रांशी (EPIC) आधार क्रमांक जोडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानंतर निवडणूक आयोगाने 2022मध्ये स्वेच्छेने मतदारांकडून आधार क्रमांक गोळा करण्यास सुरूवात केली.

> “निवडणूक आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना नियमितपणे यादी पडताळण्याच्या सूचना दिल्या आहेत. ऑगस्ट 2024 मध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात आयोगाने म्हटले आहे की, 'पुनर्निरीक्षण उपक्रमाच्या सध्याच्या फेरीत EPIC क्रमांकांमधील तफावत 100 टक्के दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश देत आहे.'

तसे तर निवडणूक आयोगाने अद्याप हे दोन्ही डेटाबेस लिंक केलेले नाहीत. मतदार याद्यांमधील बनावट नावं बाजूला करून नव्याने याद्या तयार करण्यासाठी आधार जोडण्याचा मुद्दा विचारात होता. असं असतानाही मतदारांसाठी आधार-EPIC लिंकिंग अनिवार्य केलेले नाही. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांचा समावेश असलेले निवडणूक आयोग 18 मार्चला मतदार ओळखपत्रांशी आधार क्रमांक जोडण्याबाबत चर्चा करणार आहेत. ही चर्चा केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन, विधिमंडळ विभागाचे सचिव राजीव मणी आणि UIDAIचे सीईओ भुवनेश कुमार यांच्याशी केली जाणार आहे. विरोधी पक्ष इंडिया ब्लॉकच्या पक्षांनी देशाच्या विविध भागातील मतदार यादीत अनियमिततेचा आरोप केल्याच्या पार्श्वभूमीवर ही बैठक होत आहे. तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगाल आणि इतर राज्यांमधील मतदारांचे एकसारखे EPIC क्रमांक असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कोलकाता इथे झालेल्या पक्षपरिषदेत हा EPICचा मुद्दा उपस्थित केला होता.

### विरोधी पक्षनेते राहुल गांधींची मागणी

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मतदार याद्यांमध्ये फेरफार झाल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यावर चर्चा करण्याची मागणी लोकसभेत केली होती. 'महाराष्ट्रासह प्रत्येक राज्यात मतदार यादीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत असे त्यावेळी राहुल गांधी म्हणाले. 'आधार क्रमांक हे खरा मतदार ओळखण्यात क्षेत्र चौकशी प्रक्रियेत मदत करतील', असे आयोगातील सूत्रांनी सांगितले. तरीसुद्धा, निवडणूक आयोगाने बोलावलेली बैठक म्हणजे याप्रकरणी सारवासारव करण्याचा प्रयत्न असल्याचे तृणमूल काँग्रेसने म्हटले आहे. 'आम्ही सातत्यपूर्ण मोहीम राबवली आणि आमच्या विरोधी पक्षांनीही यात सहभागी होत संवैधानिक कर्तव्याची जाणीव करून देत मतदार यादीचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न केला आहे', असे तृणमूल काँग्रेसच्या खासदार सागरिका घोष यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे. तसेच 'निवडणूक आयोगाने आतापर्यंत तीन प्रसिद्धी पत्रके जारी केली, डुप्लिकेट EPIC कार्ड दुरुस्तीचे आश्वासन दिले आणि आता EPIC क्रमांक आधारशी जोडण्यासाठी ते UIDAIला भेटणार आहेत. मात्र हे लक्षात घ्या की पडताळणी केलेल्या मतदार यादीशिवाय, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका होणे शक्य नाही', असेही घोष म्हणाल्या.

# महाबोधि महाविहार मुक्ति आंदोलनाचे समर्थनाथ भीम चौकात धरणे आंदोलन



**नागपूर :** महाबोधि महाविहार मुक्ति आंदोलनाच्या समर्थनाथ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, बोधि मित्र फाउंडेशन, सयुक्त बुद्ध विहार समिति तर्फे भीम चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतल्या जवळ धरन आंदोलनात भंते सुरई ससाई यानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना अभिवादन करून बुद्ध वंदना नंतर शांति मार्चला शुरुआत झाली, यात भारतीय बौद्ध महासभा,समता सैनिक दल, बोधि मित्र फाउंडेशन, भीम चौक नवयुवक संघ, व इतर सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, महिला मंडल, बहु सखेने, नागरिक उपस्थित होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक मिलिंद मेश्राम यानी केले. विजय देशभ्रतार, भंते सुरई ससाई उपस्थित होते.

या कार्यक्रमात, महेंद्र भागे, नरेश महाजन, ॲड. स्मिता कांबले, मनोहर दुपारे, हरीश नागदेवे, भूपेश कांबले, देवानंद पानतावने, गोवर्धन भेले, हरीश नारनवरे, प्रवीण वाहने, अरविंद देशभ्रतार, मनोहर उके, प्रशांत खोबरागड़े, सचिन वासनिक, दिनेश कांबले, संजय मेश्राम, ॲड. बी.एल. मेश्राम, आभास देशभ्रतार, देशराज मेश्राम, छोटू खांडेकर, मनोज चव्हाण, राजरत्न बसोंड, संजय राउत, अनिल दुर्गे, पूनमचंद खोबरागड़े, संतोष लोनारे, राज कुमार तिडके, विकास बारमाते, लाहानू, रमेश धवले, आनंद मेश्राम, एन.व्ही. बहादुरे, स्नेहल देशभ्रतार, चंद्रप्रभा मेश्राम, शालिनी मोड़क, शालिनी दीपक मेश्राम, शालिनी पानतावने, कल्पना नारनवरे, सुनयना देशभ्रतार, हेमलता मेश्राम, वैशाली देशभ्रतार, अर्चना देशभ्रतार, शालिनी मोड़क, धर्मवती बागड़े, संत कला रामटेके, सत्यभामा दूपारी, शालिनी रंगारी, सुजाता वासनिक, पुष्पा मेश्राम, इत्यादि नागरिक उपस्थित होते,

# मतदारसंघ पुनर्रचना 25 वर्षे पुढे ढकलली



**नवी दिल्ली :** अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने 2001 मध्ये 1971 च्या जनगणनेच्या आधारे लोकसभा व विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेवरील स्थगिती 2026 पर्यंत वाढवली होती. 21 ऑगस्ट 2001 रोजी लोकसभेत यासंदर्भात घटनादुरुस्ती विधेयक सादर करताना तत्कालीन केंद्रीय कायदे मंत्री अरुण जेटली म्हणाले होते की 'मतदारसंघ पुनर्रचना पुढील 25 वर्षांसाठी स्थगित करावी. कारण काही राज्यांनी कुटुंब नियोजन कार्यक्रम अतिशय प्रभावीपणे राबवला आहे आणि काही राज्ये त्यात अपयशी ठरली आहेत. त्यानंतर ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवराज पाटील यांनी कुठल्या राज्यात किती जागा वाढवल्या जाव्यात यासंदर्भात एक सूत्र मांडले. त्यानुसारच भविष्यात जागा वाढवण्यास सुचवले होते. जेणेकरून ज्या राज्यांनी लोकसंख्या यशस्वीरित्या नियंत्रित केली आहे त्यांचे नुकसान होऊ नये.

# मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथे रुग्णालयात भीषण आग!

**भोपाल :** मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर शहरातील एका सरकारी रुग्णालयात रविवारी पहाटे आग लागल्याची भीषण घटना समोर आली. या आगीच्या घटनेनंतर 190 हून अधिक रुग्णांना रुग्णालयातून वाचवण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.



ग्वाल्हेरच्या जिल्हाधिकारी रुचिका चौहान यांनी या घटनेबद्दल माहिती देताना सांगितले की, कमला राजा रुग्णालयाती पहाटे 1 च्या सुमारास स्त्रीरोग विभागाच्या अतिदक्षता विभागात (आयसीयू) एअर कंडिशनरमध्ये आग लागली. 190 हून अधिक रुग्णांना ज्यामध्ये 13 आयसीयूमधील रुग्णांचा देखील समावेश होता, या आगीतून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि दुसऱ्या रुग्णालया हलवण्यात आले, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

कमला राजा रुग्णालयाच्या स्त्रीरोग विभागात शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असण्याची शक्यता आहे, अशी माहिती राज्याच्या जनसंपर्क विभागाने जारी केलेल्या निवेदनात देण्यात आली आहे.

आगीच्या घटनेची होणार चौकशी

रुग्णालयाच्या सुरक्षा रक्षक आणि वॉर्ड बॉय यांनी खिडक्यांच्या काचा फोडून तात्काळ आयसीयूमध्ये भरती असलेल्या सर्व रुग्णांना बाहेर काढले आणि त्यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे चौहान म्हणाल्या. आयसीयू आणि इतर वॉर्डमध्ये भरती होते ते सर्व रुग्ण सुरक्षित आहेत, तसेच या आगीच्या घटनेच्या चौकशीचे आदेश दिल्याचेही त्यांनी नमूद केले. आयसीयूमधील 13 रुग्णांना आणि रुग्णालयाच्या इतर वॉर्डमधील जवळपास 180 रुग्णांना बाहेर काढून मेडिकल कॉलेज कॅम्पसमधील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले, असे निवेदनात म्हटले आहे.

आयुष्यमती शिला वसंत डोंगरे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



वय झाले कितीही तरी
तुझे प्रेम कधी कमी होणार नाही
सुरकुतलेल्या हातांची माया
कधीच कोणाला येणार नाही

: शुभेच्छूक :

वसंत हंसराज डोंगरे, सचिन वसंत डोंगरे, प्रियंका सचिन डोंगरे, शशांक वसंत डोंगरे, श्वेता विनोद गजभिये, शिल्पा राजेंद्र रामटेके, राजेंद्र रामटेके, श्रेया राजेंद्र रामटेके, विनोद गजभिये, अनिल तानबाजी मेश्राम, जया अनिल मेश्राम, नरेंद्र तानबाजी मेश्राम, वंदना नरेंद्र मेश्राम.






“ आत्मविश्वासाने व्यक्तिमत्त्वाला तेज मिळते. ”



## संपादकीय

# परिवर्तनाचा प्रारंभ

गुजरातमधील नेते भाजपला मिळाले हा राहुल यांचा संशय नसून त्यांना तशी खात्री आहे व तशीच खात्री पक्षाला झारखंड, हरियाणा, दिल्ली आदी राज्यांबाबतही झाली आहे. त्यांच्याकडे तसे पुरावे असल्याशिवाय ते असे बोलूच शकणार नाहीत. काँग्रेसला मोदींचे सरकार मध्येच कोसळेल अशा आशेवर बसून राहण्याची गरज नाही. मोदी सरकार तेवढे ठिसूळ पायावर उभेही नाही आणि समजा जर सरकार कोसळलेच तर पर्याय देण्याची काँग्रेसची आज तरी क्षमता नाही हेही दुर्लक्षित करता कामा नये. यामुळे आपल्या घराची डागडुजी करणे किंवा नव्यानेच उभारणीच्या कामाला सुरुवात करणे हेच पर्याय काँग्रेसकडे आहेत. कुटुंबामध्येच नेतेपद देण्यापेक्षा नव्या चेहऱ्यांना पुढे आणण्याचे आणि त्यात सर्व समाज घटकांना सामावून घेण्याचे सर्व पर्याय राहुल यांना करायचे होते ते पक्षातल्याच काहींनी हाणून पाडले हेही लपून राहिलेले नाही. जर राहुल यांना पक्षात राहून पक्षाची वासलात लावणाऱ्या अशा नेत्यांची हकालपट्टी करून नवा एकसंघ आणि विचारधारेला प्राधान्य देणारा पक्ष निर्माण करायचे सूचले असेल तर त्याचे लोकशाहीच्या अंगाने विचार करता स्वागतच केले पाहिजे. परिवर्तनासाठी कुठूनतरी सुरुवात करावीच लागते. गुजरात दौऱ्यात राहुल गांधींनी परिणामांचा विचार न करता हल्लाबोल केला. विरोधी पक्षनेता असल्यामुळे राहुल यांनी सरकारवर प्रखर आणि झोंबणारी टीका करणे अपेक्षित आहे. त्यांनी तसे केलेही आहे. त्यांच्या पात्रतेबद्दल शंका निर्माण व्हावी अशी पेरणी सर्व माध्यमातून करण्यात आल्यावरही राहुल हटले नाहीत व सरकार विरोधातील त्यांचा स्वर प्रबळ होत गेला. तथापि, त्यांनी आता जी टीका केली आहे ती भारतीय जनता पार्टीवर नाही. त्यांनी आपल्याच पक्षाच्या नेत्यांना लक्ष्य केले. त्यांच्या या भूमिकेमुळे काँग्रेस निष्ठावानांना हायसे वाटले असणार. तर राहुल यांच्या विरोधकांच्या मते किंवा राजकीय जाणकारांच्या मते राहुल यांनी स्वयंगोल किंवा इंग्रजीत ज्याला 'सेल्फ गोल' म्हणतात ते केले. अर्थात, या टीकेकडे राहुल यांनी पाहण्याची आवश्यकता नाही त्याचे कारण गेल्या दशकात काँग्रेसचे झाले तेवढे नुकसान भरपूर आहे. आता खालच्या ठिसूळ मजल्यावर नवी इमारत उभारण्यापेक्षा नवा पाया घातला तरच काँग्रेससाठी ते हितावह ठरणार असून राहुल यांची त्याच दिशेने वाटचाल सुरू झाली असावी असे प्रतित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचा बालेकिल्ला असणाऱ्या गुजरातमध्ये राहुल गेले होते. गुजरात विधानसभेच्या निवडणुका दोन वर्षांनी होणार असल्या तरी तयारी सुरू करण्याची हीच योग्य वेळ. त्यानुरूप राहुल कामाला लागले. सरकारच्या विरोधात वातावरणनिर्मिती करायची आणि मुद्दे शोधायचे अथवा निर्माण करायचे असा साधारण विरोधी पक्षांचा पॅटर्न असतो. राहुल यांनी त्यालाच फाटा दिला. ते म्हणाले की, गुजरातच्या काँग्रेस नेतृत्वात दोन प्रकारची माणसे आहेत. यातील एका प्रकारातील नेते जनतेसोबत उभे आहेत, त्यांच्याहृदयात काँग्रेसची विचारधारा आहे. दुसरे असे काही नेते आहेत की त्यांची जनतेपासून नाळच तुटली आहे. यांच्यातील निम्मे जणांनी भाजपशीच हातमिळवणी केली आहे. पक्षाचा नेता म्हणून आता माझी ही जबाबदारी आहे की अशा लोकांना बाजूला करणे. तसे करताना 30-40 नेत्यांना पक्षातून काढावे लागले तरी काढले गेले पाहिजे. गुजरात राज्य हे एका ठिकाणी अडकून पडले आहे. राज्याला बाहेर काढण्यात काँग्रेस पक्ष असमर्थ ठरला आहे. लोकांच्या काँग्रेस पक्षाकडून ज्या अपेक्षा होत्या त्या पूर्ण करण्यात काँग्रेस अपयशी ठरली आहे. प्रदीर्घ काळ देश चालवण्याचा अनुभव असणाऱ्या पक्षातील आणि कुटुंबातील व्यक्ती जर आपल्याच पक्षाची जाहीर चिरफाड करत असेल तर त्याकडे अगदी सहजपणे पाहणे किंवा स्वयंगोल वगैरे अशी त्यांची संभवना करणे अगदीच अपरिपक्वतेचे लक्षण समजायला हवे. किंबहुना राहुल गांधी यांनी आपल्याच घरातील निखारेशोधण्याचा आणि त्यांना जाहीरपणे इशारा देण्याचा जो आणखी एक धाडसी प्रयत्न केला आहे त्यातून भविष्यात काँग्रेसचे आणि प्रबळ विरोधी पक्ष किंवा समर्थ राजकीय पर्याय मिळाल्यामुळे देशाचे कल्याणच होईल. मोदी पर्वाच्या उदयापासून म्हणजे 2014 पासून काँग्रेस सातत्याने पराभूत होत आहे. मोदी यांच्या गुजरातमध्ये काँग्रेसची पराभवांची मालिका त्याच्याही दीड दशक अगोदर सुरू झाली. राहुल यांच्याकडे काँग्रेसचा सुकाणू आल्यापासून काँग्रेसचे तब्बल 49 पराभव झाल्याचे काही दिवसांपूर्वीच भाजपमधील एका गणिताचार्याने हिशेब करून सांगितले. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपविरोधी पक्षांची मूठ बांधली गेली होती. त्यांना सत्तांतर घडवता आले नाही तरी भाजपची ताकद कमी करण्यात यश आले. भाजपच्या जेवढ्या जागा कमी झाल्या तेवढ्या काँग्रेसच्या वाढल्या आणि गेल्या दोन टर्ममध्ये अधिकृत विरोधी पक्षनेताही लोकसभेला मिळाला नव्हता तो राहुल यांच्या रूपाने सभागहाला मिळाला. लोकसभेतील एकजूट कायम राहिली असती तर महाराष्ट्र, हरियाणा आणि दिल्ली विधानसभा निवडणुकांमध्ये जे घडले ते घडले नसते आणि या तीनही राज्यांत काँग्रेस भक्कम झाली असती. मात्र, विरोधकांना दुही भोवली. राहुल यांचे गुजरात दौऱ्यातील जाहीर वक्तव्य त्या दुहीबाबत नाही, तर पक्षातील अंतर्गत दुहीबाबत आहे. पराभवाच्या कारणाचा अभ्यास करताना ईव्हीएम, मतदार याद्यांमधील विसंगती आदींकडे बोट दाखवले गेले. तथापि, पराभवाची हीच एकमेव कारणे नाहीत तर बऱ्याचदा आतली जमीन भूसभुशीत करून विरोधकाला आत प्रवेश करणे सोपे करणारेही आपल्याच स्वतःच्या पतनाला हातभार लावत असतात. काँग्रेसच्या राहुल कालखंडातीलच नाहीतर अगोदरच्या कारकिर्दीतील पराभवांबाबत हेच सत्य आहे की काँग्रेसजनांनीच काँग्रेसचा पराभव केला. ■ ■

बहुजन सौरभ

# बुद्ध विहार अधिवेशनाची शृंखला लाभदायक!

*शनिवार - रविवार दि. 26 आणि 27 एप्रिल, 2025 रोजी संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा संभाजी नगर (औरंगाबाद) येथे दोन दिवसीय बुद्ध विहारांचे तिसरे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. जगप्रसिद्ध बौद्ध भिक्खू डॉ. भदंत विनय रक्खिता हे अधिवेशनाचे अध्यक्ष राहणार आहेत. धम्मचारी मैत्रेयनाथ, पुणे हे उद्घाटन करतील. कॉम्रेड धनाजी गुरव हे प्रमुख पाहुणे राहतील.*

दुसऱ्या दिवशी डॉ. भदंत विनय रक्खिता समारोप करतील. त्यानंतर डॉ. एम. ए. वाहूळ यांचे अध्यक्षतेखाली खुले अधिवेशन होईल. त्यावेळी प्रदीप चकमा (त्रिपुरा) आणि टेक्सास गायकवाड (पुणे) हे प्रमुख पाहुणे राहतील. या अधिवेशनाचे संयुक्त स्वागताध्यक्ष ऊर्जा भूमीचे अध्यक्ष चेतन कांबळे आणि मानव सेवा शोध संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य सुनील वाकेकर हे राहतील.

धम्मनिकाय स्मरणिका मुख्य संपादक प्रा. भारत शिरसाट राहतील. सुकानु समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध चित्रकार व साहित्यिक राजानंद सुरडकर राहतील. डॉ. एम. ए. वाहूळ हे मार्गदर्शन समितीचे अध्यक्ष असून महानगरातील गणमान्य व्यक्ती मार्गदर्शक आहेत. विजय बचके प्रचार प्रमुख आहेत. मुख्य संयोजक सखाराम धानोरकर आणि किशोर सरोदे आहेत. मुख्य आयोजक बद्ध विहार समन्वय समितीचे केंद्रीय अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध आणि केंद्रीय महासचिव प्रा.आनंद भालेराव आहेत. पश्चिम बंगालचे आणि महाबोधी विहार आंदोलनाचे नेतृत्व करणारे आकाश लामा यांचे अध्यक्षतेखाली प्रथम चर्चा होईल. 'बौद्धांच्या समस्या आणि उपाय' हा विषय आहे. ऊ. प्र.चे दयासागर बौद्ध, मध्य प्रदेशचे मिलिंद बौद्ध, नाशिकचे आचार्य राजेंद्र भालशंकर, संभाजीनगरचे डॉ. अरूणाताई लोखंडे, धम्मचारी सुचिरत्न हे मार्गदर्शन करतील. गुजरातचे रमेशभाई बँकर यांचे अध्यक्षतेखाली 'विहार संस्कृती निर्माण करण्यासाठी बुद्ध विहार समन्वय करण्याची गरज' या विषयावर दुसरे चर्चासत्र होईल. त्यामध्ये डॉ. उल्हास आंबेडकर (गोवा), जयाजिराव पड्घन (हिंगोली), मेहराताई गायकवाड, (मुंबई) भेरूलाल नामा बौद्ध, (राजस्थान), डॉ. प्रतिभा अहिरे,(संभाजी नगर)हे मान्यवर मार्गदर्शन करतील.

'आदर्श बुद्ध विहार निर्मिती करीता बुध्द विहार संचालकांची जबाबदारी' या विषयावर जयसिंगपूर येथील दीपक कामत यांचे अध्यक्षतेखाली होणाऱ्या चर्चासत्रात डॉ. रंजनाबेन वांडकर (गुजरात), व्ही. पी. सिंग (दिल्ली), अभिमान सोनवणे (मध्य प्रदेश), उमेश नागदीवे (गोंदिया), महेंद्र बुध्दरत्न(भागडी) आणि जगन शेजवळ (संभाजी नगर) हे मार्गदर्शन करतील. डॉ.भदंत बोधिपालो महास्थविर यांची प्रमुख धम्म देसना राहील. अशोक सरस्वती बौद्ध यांचे आंबेडकरी कीर्तन होईल.

दुसऱ्या दिवशी समितीचे संस्थापक अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध यांचे अध्यक्षतेखाली प्रतिनिधी सत्र होईल. त्यामध्ये वेगवेगळ्या राज्याचे प्रतिनिधी आणि समितीच्या विविध उपक्रमाचे प्रभारी प्रतिनिधी सत्रात कामाचा आढावा आणि विचार मांडतील. आपल्या प्रदेशातील बुद्ध विहारांची परिस्थिती विषद करतील. उत्तर प्रदेशचे डॉ.शशिकांत सिंह, डॉ.ओंकार वानखेडे, बिहारचे विनोद कुमार बौद्ध, मध्य प्रदेशचे प्रा. बी. के. खातरकर, छत्तीसगडचे राजेंद्रकुमार नरहरी, तामिळनाडूचे जी. मोहनन आणि सुब्रम्हणी, त्रिपुराचे प्रदीप चकमा, पश्चिम बंगालचे आकाश लामा, गोव्याचे मिलिंद माटे, दिल्लीचे बनवारीलाल आणि प्रकाश जांभूळकर, गुजरातचे डॉ. रंजना वांडकर, राजस्थानचे कैलासचंद खाडिया, नागालँडचे लामा, हरियाणाचे देवी दयाल फुले, संघो ॲपचे ज्ञानप्रकाश बौद्ध (गुजरात), पालि भाषा परीक्षेबद्दल ए. के. पाटील, लेणी संवर्धनबद्दल प्रा. घनशाम धाबर्डे, समन्वय मॅरेज ब्युरो बद्दल उत्तम मेश्राम माहिती सादर करतील. त्याचबरोबर पंजाब, कर्नाटक, ओरिसा, अरूणाचल, केरळ, लडाख, उत्तराखंड, झारखंड येथील प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे. दोन्ही दिवस भिक्खू शीलरक्षित महास्थाविर (सावनेर) आणि डॉ. भदंत चंद्रबोधी(संभाजी नगर) हे वंदना व सुत्तपठन करतील. भारतात किती बुद्ध विहार आहेत? किती चर्च आहेत? किती मसीदी आहेत? किती मठ आहेत? किती गुरुद्वारा आहेत? बुद्ध विहार सोडून सर्वाचे जवळ उत्तरे आहेत. बुद्ध विहार किती, कसे आणि कशासाठी याचा काहीही ताळमेळ नाही. बुद्ध विहाराची संस्कृती आणि आचार संहिता आहे. पण कुणालाच ती माहिती नाही आणि ती करून घेण्याची कुणाला गरज व ईच्छा देखील वाटत नाही. विहारात बौद्ध भिक्खूनाही राहू देत नाही. मालकी हक्क सांगितला जात आहे. त्यामुळे प्रत्येक विहारात प्रचंड कलह आहे. गट तट पडले आहेत. मैत्री सोडा एक दुसऱ्याचा प्रचंड तिरस्कार आहे. निवडणूक आली की ते राजकीय दलालीचे केंद्र बनते. काही खिशात काही विहारात अशी ती दलाली विभाजित होते. धम्म लयाला जात आहे. चार पाच म्हाताऱ्या वंदना करतात. पुरुष मंडळी वंदनेला जात नाहीत. कारण वंदनेचा वेळ आणि त्यांचा दारू पिण्याचा वेळ सारखाच असतो. त्यामुळे पुरुष विहारात येत नाही. काही विहार केवळ रविवारी उघडतात. त्याच दिवशी वंदना होते. केवळ इमारती उभ्या आहेत. धम्म प्रशिक्षण, उपासना, भिक्खू निवास आणि प्रसार, ध्यानसाधना यासाठी उपयोग काहीच नाही. अशी वाईट अवस्था आहे. अलीकडे ते प्रतिक्रांतीची केंद्र होत आहेत. आंबेडकरी चळवळीचे विरोधात असलेले लोकांचे हातात त्या विहारांचे संचालन आहे. अनेक विहारांचे अध्यक्ष व्यसनी आहेत. भांडखोर आहेत. या विषयावर सुज्ञांचे दुर्लक्ष झाले आहे. म्हणून ही परिस्थिती निर्माण झाली. ती ठीक करणे सुज्ञ लोकांचीच जबाबदारी आहे. हजारो सामाजिक, राजकिय आणि धार्मिक संघटनामध्ये जरी आपण लोक विभाजित व विखुरले असलो तरी बुद्ध विहारमध्ये आपण श्रद्धेने जातो. कारण तेच आपले शक्तीस्थळ आहे. ते कायम ठेवण्यासाठी बुद्ध विहार संचालक, उपासक, धम्म प्रचारक, धार्मिक नेते, साहित्यिक, कलावंत, राजकिय व सामाजिक नेते आणि कार्यकर्ते यांनी आपसात समन्वय करून ही बिघडलेली घडी दुरुस्त केली पाहिजे. यासाठी 2014 सालापासून नागपूर शहरातून या प्रयत्नांना सुरुवात झाली. बुद्ध विहारांच्या जिल्हा निहाय याद्या तयार करून जनतेसाठी प्रसिद्ध करणे, सर्वसंमत असे उपक्रम बुद्ध विहाराना देणे, त्यांच्या परिषदा घेणे, बुद्ध विहारात जाणाऱ्या लोकांचे अधिवेशन घेणे, पालि भाषा परीक्षा आयोजन, बाल संस्कार शिबिर आयोजन, धम्म प्रशिक्षण शिबिराचे आयोजन, पालि भाषा प्रशिक्षण शिबिर, कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळा आयोजन, धम्मपद पाठांतर स्पर्धा आयोजन, पालि भाषा साहित्य संमेलनाचे आयोजन, जपानी भाषा प्रशिक्षण, विवाह मंडळ, व्याख्यान आयोजन, धम्मनिकाय स्मरणिका प्रकाशन, लेणी संवर्धन हे उपक्रम सतत राबविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे हा विषय देशाच्या 23 राज्यात नेण्यात यश आले. त्यासाठी बुद्ध विहार समन्वय समिती नोंदणीकृत संस्था निर्माण करून ते व्यवहार कायदेशीर करण्यात येत आहेत. समितीमध्ये कोणत्याही संघटनेचा बौद्ध व्यक्ती कार्य करू शकतो. केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यासारख्या देशद्रोही संघटनेच्या कार्यकर्त्यांना यात प्रवेश नाही. असेल तर त्याला काढून टाकल्या जाते. यासाठी 27 वर्षाचा समयबद्ध कार्यक्रम आखला आहे. महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील प्रत्येक गाव खेड्यात हे अभियान नेण्यासाठी नाशिक, पुणे, औरंगाबाद, मुंबई, गोवा, भोपाल, रायपूर, हैद्राबाद, अहमदाबाद, बंगळुरू या ठिकाणची साखळी करून बुद्ध विहारांचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजन करण्यात येते. त्या अधिवेशनात देशाच्या दिल्लीपासून तर कन्याकुमारी पर्यंत, अहमदाबादपासून तर कोहिमापर्यंत सर्व राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या बौद्ध प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात येत असते. त्या माध्यमाने त्या प्रांतात हे उपक्रम राबविले जातात. अरूणाचल प्रदेश, कोहिमा, आगरतला, मद्रास, कलकत्ता, अहमदाबाद, बेंगळुरू, भोपाळ, हैद्राबाद, दिल्ली, लखनौ, पटना, जयपूर, पणजी या सर्व ठिकाणी पाय ठेवण्यास जागा निर्माण केली. त्याला परिषद आणि अधिवेशन हा उपक्रम माध्यम ठरले. म्हणून दरवर्षी एक राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात येते आहे. यावेळी नाशिक, पुणे नंतर यावर्षी औरंगाबाद येथे आधिवेशन होत आहे. त्यानंतर मुंबईला राहील. त्यानंतर महाराष्ट्राचे बाहेर अधिवेशने होतील. ही शृंखला इव्हेंट नाहीत. त्याचा उपयोग बुद्ध विहारांचा समन्वय करून बुद्ध विहारात बुद्ध विहार संस्कृती निर्माण करणे हा हेतू साध्य करणे आहे. हे कठीण आणि किचकट कार्य आहे. पण ते अशक्य मात्र नाही. ते एकाएक होणार नाही. हळू हळू ते होईल. त्याची आवश्यकता आहे. हे लोकांना कळायला लागेल आणि ते होत जाईल. त्याशिवाय भारत बुद्धमय होऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार करणे प्रत्येक बौद्ध व्यक्तीचे कर्तव्य आहे. आपल्या सर्वांचे सहकार्याने हे आयोजन होत आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा विषय ज्यांचे डोक्यातून निर्माण झाला ते मिलिंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आंबेडकरी विचारवंत डॉ. एम. ए. वाहूळ यांचे मार्गदर्शनात आयोजन आणि संयोजन समिती स्थापन करण्यात आली. ऊर्जा भूमीचे विश्वस्त चेतन कांबळे आणि मानव सेवा शोध शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य सुनील वाकेकर हे संयुक्त स्वागताध्यक्ष आहेत. चित्रकार राजानंद सुरडकर सुकानु समितीचे अध्यक्ष आहेत. प्रा.भारत शिरसाट धम्मनिकाय स्मरणिका मुख्य संपादक आहेत. विजय बचके प्रचार प्रमुख आणि जगन शेजवळ मुख्य निमंत्रक आहेत. बुद्ध विहार समन्वय समिती केंद्रीय अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध आणि महासचिव प्रा. डॉ. आनंद भालेराव मुख्य आयोजक असून संभाजी नगर जिल्हा अध्यक्ष सखाराम धानोरकर आणि महासचिव किशोर सरोदे मुख्य संयोजक आहेत. शंभर कार्यकर्ते एकजुटीने अधिवेशन यशस्वी करण्यासाठी झटत आहेत. जनतेने बुद्ध विहार समन्वय प्रक्रिया गतिमान करण्यासाठी सहभागी व्हावे. कारण आपल्या सर्वांच्या सहकार्याची आणि सहभागाची गरज आहे. ■ ■



बहुजन सौरभ

लेखांक १०२



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

# छ. शिवरायांचे रयतेचे स्वराज्य आणि अनधिकृत घरे तुटण्याचा गावठाण प्रश्न



राजाराम पाटील
मो. 8286031463

अस्तित्वात नसलेल्या मोक्षासाठी दूषित दुर्गंधीत प्रयागराज मध्ये मोक्ष मिळतो. असे सांगणारे उत्तर प्रदेश आणि केंद्र सरकार, तेथे झालेली चेंगरा चेंगरी, अनेकांचे मृत्यू तोच मोक्ष आहे. असे सागून सरकारी चुकांवर पांघरुण घालणारे तथाकथित संतगण? ही भारताने स्वीकारलेली मनुस्मृतीच्या धर्माची मानसिक गुलामगिरी आहे. जो मोक्ष चार्वाक बुद्ध महावीर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आमच्या संविधानकाराणी नाकारला आहे. याच पद्धतीने छत्रपती शिवरायांच्या कर्तृत्वावर प्रश्न उपस्थित करणारे राहुल सोलापूरकर आणि आता लोकप्रिय छावा चित्रपटावर ब्रह्मण क्षत्रिय वाद उभे करणारे ब्राह्मनिर्माण करीत आहेत. त्याद्वारे लोकांच्या खऱ्या प्रश्नावर दुर्लक्ष करीत आहेत.

आपली छत्रपती शिवरायांच्या रयतेच्या स्वराज्य विचारधारे विरोधात जमीनदारी सरंजामी वृत्तीची, भूमाफिया बिल्डर धार्जिणी राजवट, अधिक मजबुतीने राबवत आहेत. देशात चालू असलेल्या या हिंदू मुस्लिम ब्राह्मण क्षत्रिय भांडणात शोषण हे स्त्री शूद्र अतिशूद्र अल्प संख्याक यांचे होत आहे. हे माझे निरीक्षण आहे.

लोकांचे शेती घरे गावे व्यापार सुरक्षा स्त्री सन्मान हे विषय रयतेच्या स्वराज्याचे होते. ब्राह्मण मराठा वादात कुणीही विद्वान साहित्यिक छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या रयतेच्या लोकन्यायी स्वराज्य प्रशासन न्याय याविषयी बोलत नाही. वर्तमान काळात पुण्यात आणि ठाणे जिल्ह्यात चाललेली गरीबांच्या घरावरील अतिक्रम कारवाई मध्ये चुकते कोणाचे? हे पहायला राज्यकर्त्या ब्राह्मण मराठा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे, अजित दादा पवार यांना वेळ नाही.

दिल्ली महाराष्ट्रात साहित्य परिषदा घेणारे साहित्यिक यांना हा तुटणाऱ्या घरांचा प्रश्न समजत नाही? लोक कलांचा अभ्यास करणारे विद्वान आपली पंच तारांकित घरे वाडे मंदिरे निर्माण करणाऱ्या ओबीसी, एससी, एसटी अल्पसंख्याक गरिबाना, स्वतःची जमीन (राष्ट्र) आणि झोपडी सुद्धा द्यायला तयार नसतील? त्यावर एका शब्दाची चर्चा करीत नसतील? तर हे कसले साहित्यिक? लोकशाहीत आज विरोधी पक्ष अस्तित्वात राहिला नाही. म्हणूनच हे फेसबुक वॉट्सप आणि वृत्तपत्रीय लेख लिहून येणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेला (अधिवेशनाला) जागे करण्यासाठी लिखाण करावे लागते. प्रत्यक्ष जमिनीवरची घरे गावठाणे वाचविण्याची लढाई लढत असतांना चार ओळी लिहिणे अवघड आहे. हे मी मनापासून मान्य करतो. महात्मा जोतिबा फुले, सावित्री माई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामान्य माणसापेक्षा का मोठे आहेत हे त्यांनी लिहिलेल्या प्रबोधनाच्या साहित्यातून समजते. म्हणूनच त्यांना माझे त्रिवार वंदन आहे. छत्रपती शिवरायांनी भूमिहीन लोकांना अर्थात स्त्री शूद्र, अती शूद्र, ओबीसी, एससी, एसटी, मुस्लिम यांनाही जमीन घरे गावठाणे नांगर बैल बियाणे, बिनव्याजी कर्ज दिले होते. हे विद्यमान महाराष्ट्र सरकार आणि नागरिकांना मी प्रथम सांगत आहे. नवीन गावे बसविणे नवे किल्ले बांधणे हे छत्रपतींचे कार्य कोणत्याही चित्रपटात दाखविले जात नाही. जसी आमच्यासाठी भाकरी बनविणारी आई चित्रपटाचा विषय नसतो. याच धर्तीवर आजचा प्रश्न आहे.



बहुजन सौरभ

ग्रामपंचायतींना बांधकाम परवाने देण्याचे अधिक कार असतात का? ग्रामीण भागात ग्रामपंचायतीकडून बांधकामासाठी मंजुरी दिली जाते. परंतु न्यायालयीन आदेशांमुळे आता अशा परवानग्या धोक्यात आल्या आणि गरीब रयत मागास वर्गीय यांची घरेही.

गाव गावठानाला अर्थात लोकांना राहण्यासाठी घरांची नैसर्गिक गरज आहे. जशी भुकेल्या प्राण्यांना अन्नाची, तहानलेल्या पशू पक्ष्यांना पाण्याची आणि आई-वडीलांना मुलांची. घरे ही माणसांची नैसर्गिक गरज आहे. निवारा हा जगण्याच्या संविधानिक अधिकाराचा विषय आहे. तर त्याला मान्यता देण्याचा अधिकार ग्रामसभा ग्रामपंचायत यांना आहे. हेच विधान सभा लोकसभा या लोकशाहीच्या सभागृहांना न समजल्यामुळे? मुंबई ठाणे रायगड पुणे येथील तुटणाऱ्या घरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. तो मानव निर्मित लोकशाही विरोधी उच्चवर्णीय लोकांनी केला आहेच. परंतु त्यांना निवडून देणारी जनता, लोक, नागरिक तेव्हढेच जबाबदार आहेत. आदिवासी ग्रामसभा वनहक्क कायदा 2006निर्माण करू शकते. मग गावठाण घर हक्क कायदा का नाही?

या प्रश्नावर आम्ही सर्व आगरी कोळी भंडारी कराडी ईस्ट इंडियन आदिवासी लोक 2005 ते 2024 पर्यंत कुळ कायदा ते गावठाण हक्क कायदा असा संघर्ष लोकशाहीत उभा करीत आहोत. लोक सहकार्य करीत आहेत. सरकार मात्र झोपल्याचे सोंग करत आहे. आपला पाठिंबा या आंदोलनास हवा आहे. ■ ■



बहुजन मानस



नागेश चौधरी ( बहुजन विचारवंत )
9970873560

# RSS भाजपला पर्याय आणि काँग्रेस

***काँग्रेस पक्षाची स्थापना 1885 ला झाली. तिच्या स्थापनेत इंग्रज, पारशी, हिंदु, मुस्लिम आदींचा सहभाग होता आणि RSS ची स्थापन केली ती फक्त आणि फक्त ब्राह्मणांनी. हेडगेवार, सावरकर, गोळवलकरादी वामनी लोकांनी आणि त्यांचे पेशवाई सत्ता आणणे होते. सावरकरांनी पेशवाईला हिंदु साम्राज्य म्हटले आहे.***

त्यांचे प्रमुख शत्रू मुस्लिम आणि इतर धर्मीयांना ठरवतात. त्याच प्रमाणे दलित, आदिवासी, ओबीसी यांना ते नीच, अस्पृश्य मानत होते. पेशवाईत त्यांचा दलित ओबीसींशी वागणूक, सत्ता व्यवहार मुस्लिम राजापेक्षाही अमानुश होता. कारण कुठल्याही मुस्लिम सत्ताधाऱ्यांनी अस्पृश्यता वा जातव्यवस्थेचा पुरस्कार केला नाही. परंतु पेशवाईत मात्र ते राबवल्या जात होते. पेशव्यांची भूमिका आणि संघाची भूमिका या एकमेकांच्या विरोधी आहेत का? फडणवीस मुख्यमंत्री झाले तेव्हा तरुण भारताने अडीचशे वर्षानंतर फडणवीस असा अग्रलेख लिहिला होता. म्हणजे पेशवाईशी संबंध जोडला होता. पेशवाई प्रमाणे संघ मनुस्मृतीचा पुरस्कार करते.

**मूळ शत्रू -**

खरे म्हणजे आर्य ब्राह्मणांचे मूळ शत्रू मुस्लिम नाही. कारण इस्लाम धर्म यायच्या आधी येथे जो संघर्ष होता तो इथल्या सिंधुजनांशी बळीराजा आदींनी असुरांशी होता. ते परस्परांचे शत्रू होते. छलकपटादी प्रकारांनी असूरांचा पराभव झाल्या नंतर त्यांना गुलाम केले. शूद्रातिशूद्र केले. म्हणजे मूळचे कोण हे लक्षात घ्यायला हवे.

RSS ची आयडियालॉजी चातुर्वर्ण्यावर, वंशावर आधारित होती, आहे. तशीच काँग्रेसची होती का?

RSS ची राष्ट्र संकल्पना आहे तीच काँग्रेसची होती का किंवा आहे का? RSS ची हिंदुराष्ट्र थियरी सावरकर आणि गोळवलकर यांची आहे. सावरकरांचे 'हिंदु राष्ट्र मीमांसा' हे पुस्तक आणि गोळवलकरांचे 'We or our Nationhood defined' हे एकच आहेत. फरक फक्त भाषेचा आहे.



बहुजन सौरभ

गांधी मुस्लिमाना शत्रू समजत नव्हते आणि ही RSS व हिंदूसभा यांच्या हिंदुराष्ट्रसाठी मोठी अडचण होती आणि म्हणून ती अडचण त्यांचा खून करुन दूर करण्यात आली. पाकिस्तानची निर्मिती हिंदुत्ववाद्यांची आहे असे राममनोहर लोहिया म्हणाले होते. आणखी कारण हेही आहे की पाकिस्तान झाले नसते तर हिंदुराष्ट्र प्रकार अमलात आणणे अशक्य होते. उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री मुलायम सिंग यांनी अशी सूचना केली होती की पाकिस्तान आणि भारत मिळून संयुक्त देश व्हावा. त्याला या लोकांनी प्रचंड विरोध केला होता. (त्यांना मुल्ला मुलायम म्हणायला लागले.)

पाकिस्तान झाला नसता तर आज संघ भाजप सत्तेत नसते. कदाचित दलित ओबीसी मुस्लिम मिळून वेगळ्या प्रकारची सत्ता असती. डॉ. आंबेडकरांनी हिंदुराज स्थापन झाले तर ते मुस्लिमांसकट सर्वावरचे संकट असेल अशी जाणीव दिली होती. पहा, 'if Hinduism is let loose... it will prove a menace to the growth of others. This is the view point not of Muslims alone but also of the depressed classes and non-Brahmins also.'

डॉ. आंबेडकरांनी ब्राह्मण सत्ताधारी जमात आहे असे 'व्हॉट काँग्रेस ॲन्ड गांधी ह्याव डन टू द अनटचेबल्स,' या ग्रंथात म्हटले आहे. त्यासाठी त्यांनी दोन बाबी सांगितल्या. सत्ताधारी जमात ती असते जिचे सांस्कृतिक वर्चस्व असते आणि उच्च नोकरशाही मधे तिची मेजॉरिटी असते. या दोन्ही बाबतीत ब्राह्मणांचे स्थान त्यावेळी आणि आजही तसेच आहे. याची जाणीव म. फुल्यांनी करुन दिली होती. यावरुन सत्ताधारी जमात इंग्रजाचे काळात तीच होती आणि आजही तीच आहे. डॉ. आंबेडकरांनी काँग्रेसला सत्ताधारी जमात म्हटले नाही. एका जातीला सत्ताधारी म्हटले. कारण काँग्रेस जन्मायच्या आधीपासून ब्राह्मण वर्चस्व होते. म. फुल्यांनीही इतिहास काळापासून अशी स्थिती होती याची मांडणी केली आहे.

**काँग्रेसचे रुट व रूप -**

आधी सांगितल्याप्रमाणे काँग्रेसचे मूळ रुप हिंदुवादी नव्हते कारण तिची स्थापना राजकीय सत्ता बदलासाठी झाली होती. तीत ब्राह्मणांचे महत्व नव्हते. परंतु पुढे पुढे ती ब्राह्मणी होत गेली. गांधी लिबरल हिंदु होते, एका अर्थी सेक्यूलर होते. त्यांना चातुर्वर्ण्यही मान्य होते. पुढे पुढे या बाबतीत त्यांच्यात लवचिकता येत गेली एवढी की ते फक्त आंतरजातीय लग्नातच जाईल असे म्हणत. डॉ. आंबेडकर आणि गांधी यांच्यात अनिहोलेशन ऑफ कास्ट वरुन जी चर्चा झाली तीत ते कट्टर ब्राह्मणी वाटत नाहीत. तरीही काँग्रेस पक्ष ब्राह्मण वर्चस्वात होता हे वास्तव आहे. याची जाणीव पेरियर रामसामींनीही गांधीना दिली होती.

ब्राह्मणांमधे आम्ही या देशात सर्वोच्च आहोत ही भूमिका वास करत आहे आणि त्या मनोभूमिकेतून नेहरू, इंदिरा, राजीव गांधी सुटले नाहीत हेही वास्तव आहे आणि यासाठी या सर्वांच्या भूमिका कशा पूरक होत्या याची अनेक उदाहरणे आहेत. नेहरूंपासून राजीव गांधीपर्यंत आहेत.

परंतु तरीही फरक एवढाच आहे की ती पूर्णपणे संघासारखी कट्टर नाही. तिची भूमिका संघाच्या हिंदुराष्ट्राची नाही वा नव्हती आणि म्हणूनच संघाने त्या पक्षाचा, त्याच्या नेत्यांचा दुस्वास केला. प्रसंगी खूनही पाडले. परंतु बहुजनांनी म्हणून त्या दोहोंना एकाच पारड्यात तोलावे का? काँग्रेसचा विरोध करायचा म्हणून आर.एस.एस.वादी व्हावे का? आणि कट्टर मनुवाद्यांचे गुलाम व्हायचे का? संघावर दबाव आणू शकता का, त्याला बदलू शकता का? आज काँग्रेस जी भूमिका घेत आहे तिच्यावर फुले शाहू पेरियर आंबेडकर कांशीराम, व्ही.पी. सिंह लालूप्रसाद यांच्या विचारांचा प्रभाव दिसत आहे. अर्थात आज राहूल गांधी जी भूमिका घेत आहेत ती मुळतल्या काँग्रेस नीती पेक्षा वेगळी आहे. संघ विरोधी आहे. परंतु राहूल गांधीची भूमिका आम काँग्रेसींना मान्य आहे का आणि असेल तर कुठवर?

राहूल गांधी दलित, आदिवासी, ओबीसी यांचे उच्च नोकरशाहीतील संख्येबद्दल उल्लेख करतात आणि त्यासाठी जनगणना झाली पाहिजे अशी आग्रही भूमिका घेतात. काँग्रेस पक्षासाठी ही नवी आगळी भूमिका आहे. याच बरोबर जातीय उच्चनीचतावादी रचनेचाही विरोध होणे आवश्यक आहे. एकूणच जात व्यवस्था नष्ट करण्यासाठीची भूमिका घ्यायला हवी. तरच तो संघ भाजपला खरा पर्याय देणे ठरेल. ■ ■

***डॉ. बाबासाहेब आंबेडकर कवी मनाचे व त्याच वेळी गंभीर मनाचे होते, असेही कधी-कधी आपणास पहावयास मिळते. पौर्णिमेबाबत त्यांच्या भाषणातील हे विधान पहा. 'पौर्णिमेच्या प्रशांत वातावरणात पूर्ण चंद्राच्या शीतलतेत माणसाला आपल्या कार्याचे सिंहावलोकन शांततापूर्वक आणि गांभीर्याने करण्याची संधी मिळते, हेच पौर्णिमेचे वैशिष्ट्य होय'.***

# पौर्णिमा, उपोसथ आणि डॉ. बाबासाहेब

आपल्या कार्याचे अशाप्रकारे सिंहावलोकन फक्त डॉ. बाबासाहेबांनीच केले असले पाहिजे. कारण त्यामुळेच तत्कालीन अस्पृश्यतेच्या 'गर्तेत' रूतलेल्या आपल्या समाजबांधवांना आपल्या बुद्धिवैभवामुळे, समाजाप्रती असलेल्या प्रामाणिकतेमुळे आणि सक्षम नेतृत्वामुळे ते बाहेर काढू शकले. (त्यासोबतच सर्व भारतीयांसाठी 'स्वातंत्र्य, समता व बंधुता' ही बुद्ध प्रणित मूल्ये व त्यांस 'न्याय' हे महत्त्वाचे तत्व जोडून 'भारतीय संविधानाचे' ते शिल्प रचू शकले आणि उपस्थित करण्यात आलेल्या शेकडो प्रश्नांचे निरसन करून त्यास आकारही देऊ शकले! हे 'येरागबाळ्यांचे' काम नव्हे, याची विनम्र जाणीव सर्वांनीच ठेवली पाहिजे, बाळगली पाहिजे. आपल्या दिल्ली येथील निवासस्थानी दिनांक 23 जून, 1956 रोजी दिलेल्या उपरोक्त भाषणात (खंड 18 भाग-3) डॉ. बाबासाहेब पुढे काय म्हणतात तेही जाणून घेणे महत्त्वाचे आहे - 'गत काळात दैनंदिन्या, रोजनिशा, कॅलेंडर्स नसायची. तेव्हा कालगणना करण्यासाठी लोक पौर्णिमेच्या दिवशी उपवास करीत असत.' इतर धर्मीयांप्रमाणे उपवासामुळे आपली सर्व पापे धुवून जातील आणि आपल्याला स्वर्गलाभ होईल अशी बुद्ध धर्माची शिकवण नाही. 'बौद्ध धर्मात अनाकलनीय वस्तू अथवा वर (बक्षिस) यांना स्थान नाही. ज्या वस्तुंची माणसाला जाणीव होऊ शकेल, ज्यांना स्पर्श करू शकेल, ज्यांच्याविषयी बोलू शकेल आणि ज्यांचा माणूस नाश करू शकेल अशाच वस्तू किंवा गोष्टींविषयी बुद्धाने उपदेश केला आहे.' यानंतर 'उपोसथ' ही बाब डॉ. बाबासाहेब कसे समजावून सांगतात ते विचारात घेतले पाहिजे. या अनुषंगाने डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या 'The Buddha And His Dhamma' या धम्मग्रंथाचा' आधार उपयुक्त ठरणारा आहे. त्यात ते लिहितात, 'The most original and unique institution created by the Blessed Lord in connection with the organisation of the Bhikkhus was the introduction of Confession, Called UPOSATH.'



बहुजन सौरभ

('भिक्खू संघविषयक भगवंतांनी निर्माण केलेली सर्वात मौलिक आणि अपूर्व संस्था म्हणजे अपराधाची स्वीकृती, ज्याला 'उपोसथ' म्हणतात.') ते पुढे असेही स्पष्ट करतात, 'The Confession was confined to the transgressions of restrictions (which were called Patimokha).'

('अपराध स्वीकृती प्रतिबंधाचे पालन करण्यासाठी होती. या प्रतिबंधाला पातिमोक्ख म्हणून संबोधले जात असे.')

थोडक्यात, 'उपोसथ ही बाब फक्त भिक्खूंसाठी विहित केली असल्याचे लक्षात घेता उपासक, उपासिका आदींचा उपोसथाशी काहीही संबंध पोचत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांचे उपवासाविषयी व उपोसथाविषयी काय म्हणणे व सांगणे आहे ते महत्त्वाचे असल्याने त्याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे, असे वाटते.' ■ ■



अशोक भरणे
मो. 9373779966

“ स्वत:वर विश्वास ठेवा, जग तुमच्यावर विश्वास ठेवेल. ”



# आंबेडकरी बाण्याचे समर्पित धनी प्रा. अशोक गोडघाटे

**मी विद्यार्थी असताना रिपब्लीकन विद्यार्थी फेडरेशनमध्ये कार्य करीत होतो. सरांच्या नेतृत्वात कार्य केले. जेष्ठ विचारवंत, लेखक, साहित्यिक, ओजस्वी वक्ते, संशोधक, समीक्षक, बुद्ध, फुले, शाहू व आंबेडकरी विचाराचा वारसा जोपासणारे संयमी निःस्वार्थी, आंबेडकरी बाणा आणि रिपब्लीकन विचारांचा वारसा जोपासणारे एक समर्पित व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. अशोक गोडघाटे होत.**

रिपब्लीकन पार्टीचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे माजी उपसभापती बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे अत्यंत निष्ठावान एकनिष्ठ सहकारी म्हणून समस्त आंबेडकरी आणि रिपब्लिकन जनतेच्या मनात प्रा. गोडघाटे यांच्या बाबत मानाचे स्थान आहे. प्रा. गोडघाटे यांचे रिपब्लिकन पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात व चळवळीत एक अभ्यासू आणि समर्पित सेनापती म्हणून समस्त आंबेडकरी चळवळीतील त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. बॅरी. खोब्रागडे साहेबांच्या नेतृत्वावर त्यांचा गाढा विश्वास होता. साहेबांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही. कोणत्याही पदाची लालसा न ठेवता त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात, स्वतःला झोकून दिले आहे. बॅरिस्टर साहेब स्वतः प्रा. अशोक गोडघाटे सर यांना देशातील विविध राज्यात पक्षाच्या कार्यक्रमाला सोबत नेत असत. त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या मोठमोठ्या सभा गाजविल्या आहेत.

बॅरि. खोब्रागडे साहेबांच्या निधनानंतर रिपब्लिकन पक्षाचे तत्कालीन अध्यक्ष माजी खासदार अ‍ॅड. दत्ता कट्टी, माजी आमदार जे. ईश्वरीबाई, शिवराम मोघा, श्यामबाबू खोब्रागडे, गिरीश खोब्रागडे, अ‍ॅड. इकबाल अहमद, हरिश्चंद्र रामटेके, यांचे समवेत पार्टीचे सरचिटणीस म्हणून त्यांचे कार्य अभिनंदनीय आहे. लोकसभेची, विधानसभेची, महानगर पालिका, जिल्हा परिषद, आदी निवडणुकीत पार्टीच्या योग्य उमेदवारांना तिकीट वितरित करून त्यांनी त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील असत. ते लोकमान्य नेते आहेत. पक्षाचे सरचिटणीस म्हणून पक्षाचे नेतृत्व केले आणि समस्त भारतभर पक्ष बांधणी करिता अधिवेशन मेळावे घेऊन, पक्षाला नवे संजीवनी देण्याचे कार्य करण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले, मुंबई येथे सर्व रिपब्लिकन गटाचे एकत्रीकरण साठी शिवाजी पार्क येथील मेळाव्यात त्यांनी खोरीपचे नेतृत्व केले आणि पार्टीची भक्कम बाजू मांडली, पार्टीच्या महामंत्री असतानाच ते रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांची आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे झालेल्या अधिवेशनात निवड झाली आणि सरचिटणीस आंध्र प्रदेशचे तडफदार युवा नेते अ‍ॅड. डी. बी. लोक यांची निवड झाली. या दरम्यान मी नागपूर शहर रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशनचा सरचिटणीस म्हणून प्रा. गोडघाटे यांचे नेतृत्त्वात कार्य करीत होतो. त्यांना जवळून पाहण्याचा योग मला मिळाला. नंतर पक्षांच्या तमिळनाडू राज्यातील सेलम, मध्यप्रदेशातील पांढुर्णा, कर्नाटकातील गुलबर्गा, दिल्ली, मुंबई, पुणे आणि देशातील विविध राज्याठिकाणी पक्षाच्या अधिवेशनात त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण वाणीने सभा गजविल्या आहेत. 1981 मध्ये गुजरातपासून तर देशाच्या विविध प्रांतात आरक्षण विरोधी आंदोलन पेटले असताना बॅरि. खोब्रागडे साहेबांनी आरक्षण समर्थनात नागपुरातील कस्तुरचंद पार्कवर अखिल भारतीय आरक्षणवादी शिखर परिषदेचे आयोजन करून या परिषदेत संपूर्ण देशातील सर्व पार्टीच्या राष्ट्रीय नेत्यांना या मंचावर एकत्र आणून आरक्षण समर्थनात एकत्र आणून आरक्षण विरोधकांना प्रती उत्तर देऊन आरक्षण समर्थनार्थ वातावरण निर्माण केले या इतिहासिक परिषदेचे उत्कृष्ठ संचालन प्रा. अशोक गोडघाटे यांनी केले होते. या ऐतीहासिक प्रसंगाचा मी एक साक्षीदार आहे. गोडघाटे सरांचा स्वभावातील एक गुण म्हणजे रिपब्लिकन पक्षाचे मोठ्या नेत्यापासून तर जिल्हा तालुका गाव खेड्यातील प्रत्येक लहान मोठ्या नेत्यासोबत त्यांचे नावासह ओळख आणि जिव्हाळ्याचे संबंध, आजही टिकून आहेत. प्रत्येक कार्यकर्त्यांचा मनात सरांविषयी मानाचे स्थान आजही टिकून आहे. एक विशेष बाब म्हणजे, चंद्रपूरच्या बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे परिवारमध्ये आजही कौटुंबिक जिव्हाळा टिकून आहे. प्रा. गोडघाटे सर नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमी स्थित डॉ. आंबेडकर महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून नंतर विभाग प्रमुख, मराठी भाषेचा अथांग विचार धनामुळे त्यांचे कार्य दीपस्तंभसारखे आहे. सरांचा स्वभाव, सत्यवादीपणा, त्यांना खोटे बोलणे आवडत नाही, छोट्या मोठ्यांचा कार्यकर्त्यांचा, मान सन्मान, आपुलकी, प्रेम, निष्ठा हा त्यांचा जीवनातील आदर्शपणा, खरोखरच आपल्या जीवन मूल्यावर घडविणारा स्वभाव गुण प्रेरणा देणारा आहे. महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य प्रकाशन समितीचे सदस्य असताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अप्रकाशित ग्रंथ प्रकाशनाच्या मार्गी लावण्यासाठी प्रचंड कार्य केले आहे. प्रा. अशोक गोडघाटे त्यांच्या सहचारिणी प्रा. सुधाताई गोडघाटे यांच्यातील आंबेडकरी चळवळीतील विचारधन मार्गदर्शक आहेत. प्रा. अशोक गोडघाटे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! ■ ■




अशोक कोल्हटकर.
मो. 919923810137

## वाईट काळ

### अनंतायन



अ‍ॅड. अनंत खेळकर
मो. 9370061677

एक आदर्श नेता म्हणून सर्वजण त्यांचेंकडे आदराने बघायचे. नैतिकतेच्या बळाबर त्यांनी मोठमोठी पदे मिळवली. आपल्या कार्याचा ठसा उमटवून त्यांनी पदांना न्याय दिला. अनेकांना राजकारणात पुढे आणले. पण चांगल्या गोष्टींचे आयुष्य फार कमी असते. भ्रष्टाचाऱ्यांच्या दावणीला त्यांचीच माणसे बांधल्या गेली. तिच माणसे त्यांच्या विरोधात उभी राहिली. नको नको ते घाणेरडे आरोप करू लागली. अखेर त्यांची सत्ता गेली. कारण दुनिया ही खोट्या गोष्टींवर पटकन विश्वास ठेवते; पण खरेपणा मात्र सिद्ध करावा लागतो.

एक दिवस काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना ते म्हणाले, ‘फांदीवरून तुटलेले फुल पुन्हा जुळत नाही. पण फांदी आणि मुळे मजबूत असतील तर नवीन फुले उगवू शकतात. जे गेले त्यांना पुन्हा जोडण्यात अर्थ नाही. नवी माणसे जुळतील. नवी शिकवण, नवा अनुभव आला. संपूर्ण जग ‘पराभव पत्करा’ असे म्हणते तेव्हा आशा आणि आत्मविश्वासच आपल्याला सांगतो, चल उठ! पुन्हा प्रयत्न कर! मला खात्री आहे एक दिवस वेळ सुद्धा आपल्या गळ्यात पडून रडेल अन् म्हणेल तुम्हीच योग्य होते माझाच वाईट काळ होता. ■ ■

## 19 वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन, छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ. अशोक राणा यांचे भाषण

# ‘शूद्र पूर्वी कोण होते?’ हा शोधग्रंथ म्हणजे डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेला शिवरायांवरील अन्यायाचा पाढा

सन्माननीय विद्रोही बहीण-भावांनो,
आपणा सर्वांना जय जिजाऊ, जय शिवराय, जय ज्योती, जय शाहू, जय भीम!

ऐहिक 19 व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान मला दिल्याबद्दल आपणा सर्वांप्रती मी कृतज्ञ आहे. या संमेलनाच्या आयोजन समितीने मला या पदासाठी मला पात्र मानून माझ्यावर जो विश्वास दाखविला, त्याबद्दल मी सर्व संबंधितांचे आभार मानतो. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा. सतीश चकोर, प्रा. प्रतिमा परदेशी, मा. किशोर ढमाले, मा. के. ई. हरदास, मा. डॉ. रामप्रसाद तौर, चंद्रशेखर शिखरे, अ‍ॅड. वैशाली डोळस, डॉ. अनंत भवरे आदि सर्व सदस्यांचा मी शतशः आभारी आहे. ही सर्व परिवर्तनवादी मंडळी अतिशय प्रतिकूल वातावरणात पुनरुज्जीवनवादी विकृतीविरुद्ध ठामपणे उभी ठाकली आहेत. त्यांच्याप्रती माझ्या मनात अतीव आदर आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांच्यासोबत मी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सहभागी झालो याचा मला अभिमान आहे.

*विद्रोही सांस्कृतिक चळवळ आयोजित 19 वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन, छत्रपती संभाजीनगर 21, 22 व 23 फेब्रुवारी 2025. अध्यक्षीय भाषण - डॉ. अशोक राणा*

या संमेलनासाठी आपण मोठ्या उत्साहाने आवर्जून आला आहात, त्याबद्दल आपणा सर्वांचे मनापासून स्वागत करतो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला फार मोठा ऐतिहासिक वारसा आहे. या जिल्ह्यातील पैठण हे गाव पूर्वी ‘प्रतिष्ठान’ या नावाने ओळखले जात असे. त्याठिकाणी महाराष्ट्राचा हा ज्ञात आद्य राजवंश सातवाहन यांची राजधानी होती. इ.स.पू. 230 ते इ.स. 230 या कालखंडात सातवाहनांचे राज्य आजच्या महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यांच्या भूप्रदेशांपर्यंत विस्तारले होते. आंध्र प्रदेशातील धरणीकोट व अमरावती, तसेच महाराष्ट्रातील जुन्नर व पैठण ही सातवाहनांची प्रमुख ठाणी होती. पैठण ही सातवाहनांची राजधानी होती. नाशिक येथील बौद्ध लेणीच्या कोरीवकामासाठी सातवाहन राजांनी दान दिले होते.

सातवाहन सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी हा माता गौतमी बलश्री हिचे नाव आपल्या नावाआधी लावत असे. यावरून सातवाहन राजे हे मातृसत्ताक पद्धतीमधून आले होते, हे सिद्ध होते. वसिष्ठीपुत्र पुळूमावी हेही एक असेच नाव आहे. सातवाहन शासक हे प्रभावी तसेच वैभवशाली व संपन्न असूनही लोककल्याणकारी राजे होते. ते बौद्ध धर्माचे मोठे उपासक असल्याचे त्यांच्या शिलालेखातून स्पष्ट दिसून येते. ते बौद्ध धर्मीय मरहट्ट म्हणजेच आजचे मराठा असल्याचे नाणेघाट येथील शिलालेखातून स्पष्ट होते. परंतु त्यांच्या जातीविषयी विद्वानांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. सातवाहन साम्राज्याचा इतिहास लिहिणाऱ्या डॉ. वा. वि. मिराशी यांनी त्यांना ब्राह्मण ठरविले होते. त्यांचे हे मत ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर यांनी खोडले आहे.

**गुणाढ्य व पैशाची भाषा :** सातवाहनांच्या दरबारात गुणाढ्य नावाचा प्रधान होता. त्याने पैशाची भाषेत लिहिलेला ‘बृहद्‌कथा’ एकमेव ग्रंथ होता. तो संस्कृत भाषेच्या पक्षपाती लोकांनी नष्ट केला. परंतु, त्याची संस्कृत भाषेतील भाषांतरे उपलब्ध आहेत. त्याचा जन्म पैठण येथे झाल्याची माहिती मिळते. त्याने दक्षिणेकडे जाऊन संस्कृत व प्राकृत भाषांचे सांगोपांग अध्ययन केले. नंतर त्याने पैठणक्षेत्री परत येऊन सातवाहन राजाच्या दरबारात मानाचे स्थान मिळविले. त्याने पैशाची भाषेत सात विद्याधरांच्या कथा लिहिल्या व त्यांची एक बृहत्कथा बनविली. भूत-पिशाच्च म्हणून वैदिक व पौराणिक वाङ्‌मयात ज्यांचा भितीने तर कधी तिरस्काराने उल्लेख होतो, त्या नागवंशियांची भाषा भूतभाषा किंवा पिशाचभाषा म्हणून ओळखली जाते.

पैठण येथील गुणाढ्याच्या विरोधकांनी पैशाची भाषेतील हा एकमेव ग्रंथ नष्ट केला असावा, असे याविषयीच्या दंतकथेवरून स्पष्ट होते. येथील ब्राह्मणांनी गेल्या दोन हजार वर्षांमध्ये धर्मशास्त्रामध्ये मोठा प्रभाव गाजविला होता हेही दिसून येते. त्यांच्या धर्मविषयक मतांनी महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर खूप प्रभाव गाजविला होता.

पैठणचे ब्राह्मण : महाराष्ट्राचे पहिले राजे सातवाहन हे शूद्र होते. म्हणून त्यांना नाकारण्याचे क्षुद्रकर्म ज्यांनी केले, त्यांनीच संत ज्ञानेश्वरांना शिकण्याचा अधिकारही त्यांनी नाकारला होता. संत एकनाथांनाही त्यांनी बहिष्कृत केले होते. नंतरच्या अनेक राजवटींना त्यांचा हा उपद्रव सहन करावा लागला, तसाच छत्रपती शिवरायांनाही त्यांच्या झळा सोसाव्या लागल्या. पैठण येथील भट्ट व शेष घराण्याने मध्ययुगीन कालखंडात बराच धुमाकूळ घातल्याचे तत्कालीन इतिहासावरून दिसून येते. अकबराच्या काळात ‘शुद्राचार शिरोमणी’ हा ग्रंथ लिहिणारा कृष्ण नरसिंह शेष याने कलियुगात क्षत्रिय उरले नाहीत, असे आपल्या ग्रंथात म्हटले होते. त्यामुळे या ग्रंथाच्या आधारे शिवकालीन ब्राह्मणांनी शिवरायांचा राज्याभिषेक नाकारला होता. शेष घराण्याविरुद्ध असलेल्या भट्ट घराण्यातील गागाभट्ट याने भरपूर द्रव्य घेऊन शिवरायांना राज्याभिषेक करविला. पण त्यावेळी त्याने वेदोक्त मंत्र न म्हटल्याची माहिती गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूस्करांनी दिली आहे. गागाभट्टाचा काका कमलाकर भट्ट याने तर ‘नंदान्तम क्षत्रिय कुलं’ म्हणजे नंद कुळानंतर क्षत्रिय शिल्लक राहिले नाहीत, अशी घोषणा ‘शूद्र कमलाकर’ या ग्रंथात केली होती. त्याचाच फायदा घेऊन गागाभट्टाने शिवरायांच्या स्वराज्याचा खजिना लुटला होता. याची आठवण महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या शिवरायांवरील पोवाड्यात करून दिली आहे. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘शूद्र पूर्वी कोण होते?’ या शोधग्रंथात राज्याभिषेकाच्या वेळी गागाभट्टाला दिलेल्या दान व दक्षिणेची विस्तृत जंत्रीच दिली आहे. हा ग्रंथ डॉ. बाबासाहेबांनी शिवरायांवरील अन्यायाचा पाढा वाचण्याच्या हेतुनेच रचला आहे हे स्पष्ट होते.

डॉ. अशोक राणा
मो. 9325514277

डॉ. वा. सी. बेंद्रे यांनी आपल्या शिवचरित्रात राज्याभिषेकाच्या वेळी झालेला दानधर्म, प्रायश्चित्तविधी आणि तुलादान या गोष्टींची गरज नव्हती हे सिद्ध केले आहे. तसेच यावेळी शिवरायांवर झालेल्या ‘व्रात्यस्तोम’ या विधीतून ते शूद्र होते हेच हे सिद्ध केले आहे. म्हणून ‘व्रात्यस्तोमविधी’ तसेच व्रात्य म्हणजे काय याविषयी माहिती पाहूया.

व्रात्य गृत्समद : गणेश व मुदगलपुराण अनुक्रमे भृगु व मुदगल या ऋषींनी लिहिले, असे मानले जाते. या पुराणांची निर्मिती महाराष्ट्रात तसेच विशेष करून विदर्भात आणि त्यातल्या त्यात यवतमाळ व नागपूर परिसरात झाली आहे. यामध्ये गृत्समदाची कथा आली आहे. ती कथा अशी - एकदा मगध देशामध्ये म्हणजे आजच्या बिहारमध्ये गृत्समद श्राद्धाचे निमंत्रण आल्यामुळे जेवायला गेला. त्यावेळी पंगतीला बसलेल्या ऋषींपैकी अत्री व इतर काही ऋषी होते. जेवणानंतर विद्वानांमध्ये तात्त्विक चर्चा सुरु झाली. या चर्चेत गृत्समदाने सहभाग घेतला. त्यावेळी अत्रीने गृत्समदाला तेथून उठायला सांगितले व म्हटले की, ‘तू ऋषीवीर्यापासून उत्पन्न झाला नाहीस, तेव्हा तुझा आमच्याबरोबर वाद करण्याचा अधिकार नाही.’ अत्रीचे हे अपमानास्पद बोलणे ऐकून गृत्समद श्राद्धातून रागारागाने उठून गेला. आपल्याजवळ तत्त्वचर्चा करण्याइतपत विद्वत्ता असूनही केवळ जन्माने आपण अनार्य असल्यामुळे आपणास आर्य ऋषींसोबत तत्त्वचर्चा करण्यास मनाई केली जाते ही गोष्ट त्याला बोचली. पुढे आर्यांच्या जाचक अटी स्वीकारून तो आर्यसंघात सामील झाला. त्याविषयी लो. बापूजी अणे यांनी म्हटले आहे की, ‘आपल्या जातीच्या लोकांचा आर्यात समावेश व्हावा अशी खटपट करणारा हा पूर्वकालीन सुधारक होता व त्याचे कार्य यशस्वी होण्यापूर्वी त्याला आर्यांकडून बराच त्रास झाला असावा असे वाटते. गृत्समदाच्या मुलाचे नाव त्रिपुरासुर होते. यावरून तो अनार्य होता याविषयी शंकाच राहात नाही.’

गृत्सपद व्रात्य होता ही सूतांची माहिती होती. ‘व्रात्य म्हणजे वर्णसंकरामुळे उत्पन्न झालेली जात’ असे बौधायन गृह्यसूत्र म्हणते. आर्यांमध्ये जेव्हा वर्णव्यवस्था निर्माण झाली व रक्ताच्या शुद्धतेविषयीची जाणीव तीव्र झाली तेहा ही व्याख्या तयार झाली असावी. व्रात्य ही अनार्यांमधील एक जमात होती. अनार्य असूनही आर्यांच्या ऋग्वेद या ग्रंथाचा पहिला निर्माता म्हणून त्याचे स्थान अबाधित आहे. गृत्समद हा व्रात्य होता व व्रात्यांचा गुरू बृहस्पती त्याला पूजनीय असल्यामुळेच त्याचे स्तवन करणारी ऋचा गृत्समदाने तयार केली.

बुद्धिजीवी आर्यांनी कितीही हिणविले तरी श्रमजीवी व्रात्यांनी स्वाभिमान सोडला नाही. म्हणूनच त्यांच्यामध्ये गृत्समदासारखे वैज्ञानिक, कृषीतज्ञ व विद्वान गेलेत. विशेषतः विदर्भाच्या काळ्या कसदार शेतीत कापसाची लागवड करण्याचे श्रेय गृत्समदाकडे जाते. यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथे त्याने आपली ज्ञानसाधना केली व त्यानंतर तो भ्रदावतीजवळील वरदविनायकाच्या क्षेत्री गेला, असे गणेशपुराणात लिहिले आहे. श्रमाची प्रतिष्ठा वाढविणारास ज्ञान व प्रतिष्ठाही मिळते याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे गृत्समद होय. जन्माने हीन ठरविला गेल्यावरही जिद्दीने तो मोठा झाला. आज वैदिक धर्मग्रंथांनी शूद्र आणि अतिशूद्र ठरविलेले लोक वैदिकांच्या टोळीमध्ये सामील होत आहेत. त्यांच्यासाठी पूर्वी व्रात्यस्तोम नावाचा विधी होता तर आज त्याचे नाव समरसता मंच असे आहे.




गृत्समदाप्रमाणेच ‘कवशऐलूष’ हाही अनार्यांमधील एक स्मृतिकार होता. ‘कवषस्मृती’ या नावाने त्याने रचलेला ग्रंथ होता, अशी माहिती मिळते. पण तोही ग्रंथ नष्ट करण्यात आला. त्याने स्मृतिग्रंथ रचला म्हणून त्याला सरस्वती नदीच्या काठी झाडाला बांधून ठेवण्यात आले. परंतु त्याला ‘अपोनप्त्रीय ब्रह्म’ म्हणजे पाणी वळविण्याची कला अवगत होती. म्हणून तो वाचला अशी कथा ऐतरेय ब्राह्मण या वैदिक साहित्यात आली आहे. वैदिकांच्या समाजरचनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून वर्णव्यवस्थेचा उल्लेख केला जातो. परंतु, ही व्यवस्था मुळात वैदिकांमध्ये नव्हती. या व्यवस्थेचा स्विकार वैदिकांनी उशिरा केला असावा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात आलेल्या पुरुषसूक्त या नावाने प्रसिद्ध ऋचांमध्ये तिच्या प्रारंभाची सूचना मिळते. हे मंडल नंतर ऋग्वेदात समाविष्ट झाले असल्याचे अभ्यासक मानतात.

यादवकालातील हेमाद्रीची करामत देवगिरीच्या रामदेव यादवाच्या पदरी असलेल्या हेमाद्रीपंत या अमात्याच्या काळात महाराष्ट्रात अनेक व्रत-वैकल्यांचा सुळसुळाट झाला होता. त्याच्या कृतीमुळे यादव साम्राज्य लयास गेले. यावरून हेमाद्री किंवा हेमाडपंत नावाचा विद्वान तेराव्या शतकात होऊन गेला हे स्पष्ट होते. यादवकालीन काही मंदिरातील शिलालेखांमध्ये हेमाद्रिपंडिताचा उल्लेख आढळतो. पण तो रामदेवरायाचा प्रधान होता म्हणून! तेवढ्यावरून इतिहासकारांनी त्याचे नाव मंदिर शैलीला देऊन तिला हेमाडपंती मंदिर म्हणणे अयोग्य आहे.

‘वेडा मुहम्मद’ की दूरदृष्टी असलेला?

देवगिरीच्या पतनानंतर एका गायकाला अल्लाउद्दिन खिलजी याने आपल्या सोबत नेले. त्याने ‘देवगिरी बिलावल’ या रागाची निर्मिती करून देवगिरीची आठवण कायम केली आहे. आज दौलताबादचा किल्ला म्हणून ओळखला जातो, त्याचे मूळ नाव देवगिरी हे होते. कोणे एके काळी येथे एक समृद्ध साम्राज्य बहरले होते, ते स्थान आज तालुक्याचेही ठिकाण नाही. खुलताबाद तालुक्यात ते येते.

या ठिकाणी मुहम्मद तुघलकाने आपली राजधानी दिल्लीवरून आणली होती. त्याला ‘वेडा मुहम्मद’ म्हणून प्रस्थापितांनी हिणविले होते. परंतु तो अतिशय हुशार असल्याचे पुरावे इतिहासात नमूद आहेत. तो उदार मनाचा होता, असेही इतिहासकार सांगतात. विद्वानांचा आश्रयदाता आणि बुद्धिप्रामाण्यवादी म्हणून त्याचा गौरव इतिहासकारांनी केला आहे. प्रयोगशील व सुधारणावादी शासक म्हणून ज्याचा उल्लेख इतिहासकार करतात, तो तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. त्याच्या राज्यात त्याने अनेक प्रशासकीय सुधारणा केल्या. आर्थिक व कृषी सुधारणा करताना सांकेतिक चलन रूढ केले होते. त्यामागे सोन्याचा तुटवडा हे प्रमुख कारण होते. सोन्या-चांदीच्या नाण्याऐवजी त्याने तांब्या-पितळेची नाणी घडविलीत. आजचे वास्तव रामदेवराय यादव याची राजवट ज्या परिसरात स्थिरावली होती, त्या परिसरात आज आपण आहोत.

यादवांच्या साम्राज्याला सुरुंग लावणारी ब्राह्मणशाही आजही या ठिकाणी आपला प्रभाव गाजवीत आहे. अल्लाउद्दिन खिलजी याने या साम्राज्याचा अंत केला ही एक ऐतिहासिक घटना आहे. या घटनेमुळे ब्राह्मणी दमन व्यवस्थेला सुरुंग लावला होता. त्यामुळे मराठी संतांची चळवळ आकाराला आली, असा सिद्धांत पहिल्या विद्रोही संमेलनाचे अध्यक्ष मा. बाबुराव बागुल यांनी मांडला होता. संतांची चळवळ ही खऱ्या अर्थाने जातीभेदाच्या भिंतींना तडा देणारी होती. परंतु, तिच्यामुळे केवळ सामाजिक परिवर्तनाचा धुरळा उडाला व पाचोळा होऊन खाली पडला, अशी तक्रार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. त्याची प्रचीती आज आपणास येत आहेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याकरिता झालेली चळवळ आज बरीच पुढे गेली आहे. आज महाराष्ट्राचे राज्यकर्ते दिल्लीकरांच्या पायाशी लोळण घालण्यात स्वतःला धन्य मानतात. मराठीला दिल्लीला नेऊन त्यांनी महाराष्ट्राला दुय्यम लेखले आहे. म्हणून विद्रोही साहित्य संमेलन देवगिरीच्या परिसरात घडवून विद्रोही सांस्कृतिक चळवळीने सध्याच्या प्रस्थापित व्यवस्थेला एक जोरकस धक्का दिला आहे.

क्रमशः ■ ■

# सम्राट अशोक यांचे शिलालेख

अशोक तपासे सरांची पहिली भेट अंधेरी येथील कोंडीवते लेणीवर पाच वर्षांपूर्वी झाली. शांत मृदू स्वभाव असलेल्या या व्यक्तीचा सम्राट अशोकांच्या शिलालेखाबाबतचा गाढा अभ्यास पाहून मी तेव्हा हबकून गेलो. भारतातील जवळजवळ सर्व शिलालेखांचे त्यांनी प्रत्यक्षात जागेवर जाऊन वाचन केले आहे. बरे हे एकट्याने नव्हे तर सोबत वहिनींना घेऊन शिलालेखांचे जग पालथे घातले आहे.




सम्राट अशोक यांच्यावरती जेंव्हा जेंव्हा मी पोस्ट लिहिली तेंव्हा तेंव्हा मी शिलालेखाच्या माहितीसाठी त्यांना फोन करून ती घेतली आहे. अशोक तपासे सरांनी 2009 मध्ये पालि भाषा शिकण्यास सुरुवात केली. त्याचा अभ्यास करता करता ते सम्राट अशोक यांच्या शिलालेखांचा अभ्यास करू लागले व त्यात त्यांना गोडी वाटू लागली. ब्राह्मी लिपी शिकल्यावर त्यांनी भारतभर भ्रमण केले आणि जिथे जिथे सम्राटांचे शिलालेख आहेत त्या सर्व स्थळांना भेटी दिल्या. कालसी (उत्तराखंड ) पासून ते ब्रह्मगिरी (कर्नाटक) आणि जुनागड (गुजरात) पासून ते जोऊँगडा (ओरिसा) पर्यंत त्यांनी 35 शिलालेखांचे वाचन केले. वेगवेगळ्या स्थळांवरील शिलालेखातील मजकुराबाबत व त्याच्या आशयाबाबत त्यांना फरक जाणवला व तो त्यांनी शोध निबंधातून मांडला. 2014 मध्ये त्यांचे सम्राट अशोक यांचे शिलालेखा संबंधी पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. ऑगस्ट 2023 मध्ये त्याची हिंदी आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्याच वर्षी त्यांनी श्री श्री विद्यापीठ येथे शोधनिबंध सादर करून बुद्ध यांचे महापरिनिर्वाण इ. स. पूर्व 516 मध्ये झाले असल्याचे शिलालेखावरून स्पष्ट होते असे नमूद केले. सदर शोध निबंधाचे हिंदी भाषांतर करून त्यांनी जबलपूर व तेलंगणा येथील सोशल सायन्स अँड मॅनेजमेंट स्टडीज आणि एपीग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया यांना सादर केले.

**अशोक तपासे सरांनी काल संध्याकाळी त्यांना फ्रॅंकफोर्ड युनिव्हर्सिटीने डॉक्टरेट प्रदान केल्याची बातमी मला व्हाट्सअपवर पाठविली. ती वाचल्यावर खूप आनंद झाला. सम्राट अशोक यांच्या शिलालेखा बाबत त्यांनी केलेल्या अच्युत कामगिरीची पोचपावती त्यांना मिळाली असे मला वाटले.**

अशा तऱ्हेने स्व प्रयत्नाने पालि - प्राकृत भाषा शिकून ब्राह्मी लिपीमध्ये देखील प्राविण्य मिळविले. म्हणूनच फ्रॅंकफोर्ड युनिव्हर्सिटीने त्यांना डॉक्टरेट प्रदान करून त्यांचा गौरव केला आहे. सध्या त्यांचे भारतीय बौद्ध कालमापन या एका नवीन संकल्पनेबाबत संशोधन चालू असून त्या विषयाबाबत त्यांच्याशी अनेक वेळा चर्चा झाली आहे. अनेक बुद्धिस्ट संस्था बौद्ध दिनदर्शिका प्रकाशित करतात. परंतु ती हिंदू दिनदर्शिकेची हुबेहूब नक्कल असते. फक्त त्यात बौद्ध संस्कृती संबंधित दिनविशेष लिहिलेले असतात. म्हणून पंचांगकर्ते यांच्यावर अवलंबून न राहता स्वतंत्र बौद्ध कालमापन पद्धती कशी अवलंबिता येईल याबाबत तपासे सरांचे संशोधन लवकरच प्रसिद्ध होईल असा विश्वास वाटतो. यामुळे पौर्णिमेचा योग्य दिवस कोणता याचे सर्वसामान्यांना आकलन होईल. तसेच बौद्ध सणांचा योग्य दिवस कोणता हे देखील जगजाहीर होऊन ते योग्य दिनी साजरे केले जातील.

संजय सावंत

इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगमध्ये पदविका घेतलेली व्यक्ती सम्राट अशोक यांच्या शिलालेखाबाबत इतकी अभ्यासू आहे याचे आश्चर्य वाटते. तसेच ऐतिहासिक शोध निबंध सादर करण्यात देखील पुढे आहे याचे अप्रूप वाटते. त्यांच्या नावातच अशोक आहे. हा एक योगायोग म्हणावा लागेल. समता नगर येथील टेलिफोन कार्यालयातून निवृत्त झाल्यावर शिलालेखांच्या प्रांगणात त्यांनी घेतलेली ही भरारी अशीच पुढे उत्तुंग राहो अशा मी त्यांना शुभेच्छा देतो. माननीय विदुषी उर्मिला पवार मॅडम यांनी देखील त्यांच्या कार्याची दखल घेतली असून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. तरी अशोक कोंडाजी तपासे सर यांना पुन्हा एक वार सर्वांच्या वतीने पुढील संशोधनासाठी खूप खूप शुभेच्छा...! ■ ■




# ‘देवानंपीय असोक’ चा नाट्यगृहात नाट्यजागर

**लेखक व दिग्दर्शक : उदय जाधव**

**कथासारांश :-** ‘देवानंप्रिय असोक’ हे नाटक प्राचीन भारतातील महान सम्राट अशोकाच्या जीवनावर आधारित आहे. नाटकात त्याच्या जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा दाखवला जातो, जेव्हा त्याने हिंसाचाराचा मार्ग सोडून बौद्ध धर्म स्वीकारला आणि शांती व दयाळूतेच्या मार्गावर चालले. नाटकात अशोकाच्या आंतरिक संघर्षाची आणि त्याच्या बदललेल्या दृष्टिकोनाची सखोल तपासणी केली आहे. त्याच्या व्यक्तिमत्वाच्या बदलामुळे राष्ट्रावर होणारा परिणाम, तसेच त्याच्या शासकीय निर्णयांची दृष्टीकोनात्मकता नाटकात प्रभावीपणे दाखवली आहे.

**अभिनय:-**अशोकाच्या भूमिकेतील अभिनेता प्रितेश वंदना धोंडू मांजलकर खूपच प्रभावी होता. त्याचे अभिनयाने अशोकाच्या संघर्षाचे, त्याच्या शोक, पश्चात्ताप आणि अंतर्मुखतेचे रंग टिपले. त्याने पात्राची मानसिक स्थिती व भावनांचे उत्तम प्रदर्शन केले. वीणा शिखरे या अभिनेत्रीने तिच्या कसदार अभिनयातून अरुंधती/विदिशाची भूमिका चोख वठवली, सम्राट बिंदूसार आदित्य शिर्के, पट्टमहीषी भावना जाधव, विक्रम भट, शुभम सूर्यवंशी, शुभद्रांगी हेमा इगवे, राधा गुप्त, किरण मोरे, खलातक महेश कांबळे, म्हातारी उज्वला, पूनम पवार, मांजलकर, बंधू पलीत, महादेव जाधव, सुमित प्रमोद दामोदर, सहदेव सुखविहार, प्रवीण डोने, मोगलिपुत्त तिस्स, स्वप्नील जाधव, निग्रोध अक्षय तायडे, महेंद्र मेघवर्ण, सुशांत पवार, संघमित्रा सायली साळवे, या पात्रांच्या अभिनयाने देखील त्याच्या संवादावर योग्य प्रकाश टाकला आणि कथेला वजन दिले. विशेषतः राधागुप्तची भूमिका किरण मोरे यांनी उत्तम साकारली, बौद्ध भिक्षूंच्या भूमिकाही उत्कृष्ट होत्या.

प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

**दिग्दर्शन :-** उदय जाधव यांचे दिग्दर्शन नाटकाला एक अद्वितीय गती देते. त्यांनी

## नाटकाची समीक्षा

मंचावर अशोकाच्या आंतरिक संघर्षाचे आणि त्याच्या राज्याच्या विस्ताराचे समतोल प्रदर्शन केले. विशेषतः रंगकाम आणि प्रकाशयोजनेचा वापर अत्यंत प्रभावी होता. अशोकाच्या जीवनातील गडबडीच्या क्षणांमध्ये गडद रंग आणि शांततेच्या क्षणांत हलके रंग वापरण्यामुळे त्या भावना समर्पकपणे दर्शविल्या गेल्या. वेशभूषा काळानुरूप चपखल होत्या.

**संगीत व ध्वनी प्रभाव :-** संगीताची निवड अत्यंत सूक्ष्म होती. बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाशी संबंधित शांतीपूर्ण संगीत आणि शोकाच्या प्रसंगांमध्ये वापरलेले वातावरण वाढवणारे संगीत नाटकाच्या मूडला उत्तम साथ देतात. ध्वनी प्रभाव, जसे की युद्धाचा आवाज आणि शांततेचे ध्वनी, अशोकाच्या बदलत्या मानसिकतेला अनुरूप होते.

**संदेश :-** नाटकाने अशोकाच्या जीवनातील मोठ्या बदलांचा संदेश दिला आहे. ‘हिंसा आणि युद्ध यांचे वळण सोडून शांती आणि समरसतेचा मार्ग स्वीकारणे.’ हे नाटक प्रेक्षकांना विचारात पाडते की, जीवनातील संघर्ष आणि ताण या स्थितीतील बदल नेहमीच शक्य असतो आणि त्यासाठी एक मोठा मनोधैर्य लागतो.

**एकूण मूल्यांकन :-** ‘देवानंप्रिय असोक’ एक अद्वितीय नाटक आहे जे प्राचीन भारतीय इतिहासाच्या एका महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकते. उदय जाधव यांचे लेखन आणि दिग्दर्शन त्याच्या गतीने, प्रभावाने आणि गडबडीनंतर शांततेच्या मार्गाकडे चाललेल्या अशोकाच्या चित्रणात उत्कृष्टतेची छाप सोडतात. अभिनेत्यांचा अभिनय, संगीत, प्रकाशयोजना आणि संवाद हे नाटकाच्या गाभ्यात विलीन झाले आहेत. एकंदरीत, हे नाटक प्रेक्षकांना विचार करायला लावणारे आणि त्यांच्या अंतर्मुखतेला उत्तेजन देणारे आहे.

**शिफारस :-** ‘देवानंप्रिय असोक’ एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक नाटक आहे, ज्याला प्रत्येक प्रेक्षकाने पाहावे. यामध्ये एक गोड संदेश आणि आकर्षक सादरीकरण आहे, जे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून मनावर ठसा सोडते. ■ ■

